**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, SEPT-OCT, 2021, VOL- 9/67*

# महात्मा फुले - जीवन व कार्य

**दिपाली वैजनाथ आदोडे**

*एम.फिल. ( लोकप्रशासन ), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विदयापीठ, औरंगाबाद.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:-**

19 व्या शतकामध्ये होऊन गेलेल्या अनेक समाज सुधारकांपैकी महात्मा फुले हे एक महान समाज सुधारक होते. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये एक थोर समाज सुधारक म्हणून महात्मा ज्योतीबा फुलेंना ओळखले जाते. महात्मा फुलेंनी सामाजिक विषमते विरुध्द बंड करुन शूद्र व अतिशूद्रांना सामाजिक समतेसाठी संघटित करण्याचे काम केले. स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या उध्दारासाठी महात्मा फुलेंनी केलेले कार्य अतिशय महत्वपूर्ण आहे. कारण शूद्र, अतिशूद्र, बहुजन समाज, स्त्रिया हे सर्व समाज घटक आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये अत्यंत मागासलेले होते. जुन्या वाईट रुढी परंपरामुळे शूद्र स्त्रियांचे जीवन अतिशय दयनीय झाले होते. अशा काळामध्ये महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षण व अस्पृश्यांसाठी केलेले कार्य अत्यंत महत्वाचे आहे.

महात्मा फुलेंचा जन्म 11 एप्रिल 1827 रोजी पुणे येथे झाला. महात्मा फुले यांचे मुळ गाव सातारा जिल्हयातील कटगुण हे आहे. महात्मा फुलेंच्या आजोबाच्या काळामध्ये फुले घराणे हे पुणे येथे आले होते. त्यांचे वडील पेशव्यांकडे फुले विकण्याचे काम करत होते. म्हणून त्यांचे गोरे हे आडनाव मागे पडून फुले असे पडले. महात्मा फुले एक वर्षाचे असताना त्यांची आई चिमणाबाईचा मृत्यू झाला. वयाच्या सातव्या वर्षी फुलेंचे वडील गोविंदराव यांनी ज्योतीबा फुले यांना खाजगी पंतोजीच्या शाळेत घातले होते. परंतु काही

कारणामुळे त्यांचे शिक्षण बंद झाले. ज्योतीबा फुले यांचा विवाह वयाच्या 13 व्या वर्षी धनकवडीच्या नेवसे पाटील यांची मुलगी सावित्रीबाई यांच्याशी झाला. ज्योतीबा फुले हे अत्यंत कुशाग्र बुध्दीचे होते. त्यांच्या शेजारी राहणारे उर्दू शिक्षक गफार बेग मुन्शी आणि धर्मोपदेशक लिजिट यांच्या प्रयत्नाने 1842 मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी त्यांनी पुण्यातील स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. इंग्रजी शिक्षणामुळे ज्योतीबांना नविन मानवी मुल्यांची माहिती होऊ लागली. ख्रिश्चन मिशन-यांच्या मानवतावादी भूमिकेमुळे ज्योतीबांना भारतीय समाजामध्ये धर्माच्या नावाखाली चालत असलेल्या अनेक वाईट रुढी प्रथा माहिती होऊ लागल्या. बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्रय आणि समाजातील जातीभेद पाहून सामाजिक परिस्थिती सुधारण्याचे व हिंदू धर्मातील वाईट रुढी परंपरा नष्ट करण्यासाठी कार्य करण्याचे ज्योतीबांनी ठरविले. इ.स.1848 पासून ज्योतीबांनी आपल्या सामाजिक कार्यास सुरुवात केली.

ज्योतीबांनी समाजकार्यास सुरुवात करताना सर्वप्रथम स्त्री शिक्षणास प्राधान्य दिले. भारतामध्ये हजारो वर्षापासून हिंदू धर्म व्यवस्थेने शूद्राबरोबरच स्त्रियांवरही अनेक निर्बंध लादलेले होते. स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नव्हता. बालविवाह, पुनर्विवाह, केशवपण, सती पध्दती यांसारख्या अनेक वाईट प्रथांमुळे येथील स्त्रियांचे जीवन अत्यंत वाईट होते. महात्मा फुलेंनी स्त्रियांच्या उध्दारासाठी कार्य करण्याचे ठरविले. त्यासाठी महात्मा फुलेंनी 1848 मध्ये पुण्यात बुधवार पेठेतील भिडयांच्या वाडयात मुलींसाठी पहिली शाळा काढली. त्या काळामध्ये हिंदू धर्मानुसार स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यामुळे महात्मा फुलेंनी सुरु केलेल्या मुलींच्या शाळेमध्ये मुलींना शिकवण्यासाठी शिक्षक मिळाले नाही. तेव्हा महात्मा फुलेंनी त्यांची पत्नी सावित्रीबाईनाच शिक्षण दिले आणि सावित्रीबाईनाच शाळेत शिक्षिका म्हणून नियुक्त केले. परंतु पुण्यामधील उच्चवर्णीयांना एक स्त्री शिक्षिका होऊन इतर मुलींना शिकवण्याचे काम करते ही गोष्ट सहन झाली नाही. त्यामुळे उच्चवर्णीय सनातनी लोकांनी सावित्रीबाईंना शाळेत जाताना त्रास देण्यास सुरुवात केली. अंगावर चिखल फेकणे, घाण टाकणे किंवा दगड मारणे, शिव्या देणे अशा

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

प्रकारे हे उच्चवर्णीय सनातनी लोक सावित्रीबाईंना त्रास देत असत. अशा अनेक अडचणी आल्या. तरी देखील महात्मा फुले व सावित्रीबाई यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य चालूच ठेवले. त्यानंतर महात्मा फुलेंनी 3 जुलै 1851 रोजी बुधवार पेठेतील चिपळूणकरांच्या वाडयात मुलींसाठी दुसरी शाळा काढली. 17 सप्टेंबर 1851 रोजी रास्ता पेठेत मुलींसाठी तिसरी शाळा काढली. 15 मार्च 1852 मध्ये वेताळ पेठेत मुलींसाठी आणखी एक शाळा सुरु केली.

महात्मा फुलेंच्या मते दलित अस्पृश्यांना शिक्षण दिल्याशिवाय या वर्गाची सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता होणार नाही. दलित अस्पृश्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. महात्मा फुलेंनी 1851 मध्ये अस्पृश्यांच्या मुलांसाठी पहिली स्वतंत्र शाळा काढली. त्यानंतर पुण्यामध्ये त्यांनी अस्पृश्यांच्या मुलांसाठी 3 शाळा चालू केल्या होत्या. शिक्षणाचे महत्व सांगताना महात्मा फुले म्हणतात-

" विदयेविना मती गेली, मतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविदयेने केले."

महात्मा फुलेंच्या शिक्षण कार्याची दखल घेऊन इंग्रज सरकारने 16 नोव्हेंबर 1852 मध्ये पुण्यातील विश्रामबाग येथे मेजर कॅन्डीच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. अनेक काळापासून चालत आलेल्या रुढी परंपरांमध्ये विधवांचे केशवपण ही एक प्रथा चालू होती. ही प्रथा प्रामुख्याने ब्राम्हण व सवर्ण समाजात जास्त होती. एखादया विधवा स्त्रिला ती सती गेली नाही तर आयुष्यभर तिला वैधव्यामध्ये जीवन जगावे लागत होते. तिच्या खाण्यापिण्याबरोबर कपडे परिधान करण्यावर तसेच तिने डोक्यावरचे सगळे केस कापावेत अशी अनेक बंधने तिच्यावर होती. महात्मा फुलेंनी या पध्दतीला खूप विरोध केला. पुणे व मुंबईतील सर्व न्हाव्यांना विधवांच्या डोक्यावरचे केस कापू नये असे महात्मा फुलेंनी आव्हान केले. विधवा स्त्रियांना पुन्हा जीवनात स्थैर्य मिळावे व त्यांचे जीवन पुन्हा सुखी व्हावे म्हणून महात्मा फुलेंनी विधवा स्त्रियांना पुनर्विवाह करता यावा यासाठी जागृती

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

केली. त्यांनी प्रत्यक्ष अशा स्त्रियांचे विवाह लावून दिले. 1864 मध्ये पुण्याच्या गोखलेंच्या बागेमध्ये एका विधवा स्त्रिचा महात्मा फुलेंनी विवाह घडवून आणला होता.

विधवा स्त्रियांना आपले संपूर्ण आयुष्य वैधव्यात जगावे लागत असे. त्यामुळे अशा तरुण विधवा स्त्रिया ब-याच वेळा जवळच्या नातेवाईकांच्या किंवा इतरांच्या वासनेला बळी पडत असत व आपली समाजात बदनामी होऊ नये म्हणून जन्मास आलेले मूल कोठेतरी फेकूण देत असत. अशा स्त्रियांसाठी महात्मा फुलेंनी 1863 मध्ये पुण्यात आपल्या राहत्या घरी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केले होते. महात्मा फुलेंना स्वत:ला मुलबाळ नव्हते. त्यांच्या पत्नी सावित्रीबाईनी महात्मा फुलेंना दुसरा विवाह करण्यास आग्रह धरला होता. तरीही महात्मा फुलेंनी दुसरे लग्न केले नाही. त्यांच्या बालहत्या प्रतिबंधक गृहामध्ये बाळांत झालेली एक विधवा स्त्री काशीबाई हिचे मूल त्यांनी दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले. त्या मुलाला चांगले शिकवून डॉक्टर केले. महात्मा फुलेंनी केलेले हे कार्य फार मोठे आहे.

महात्मा फुलेंनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये त्यांनी सवर्ण जातीचे कृत्य व अस्पृश्यांवर होत असलेले अन्याय अत्याचार या विषयी सविस्तर माहिती लिहिलेली आहे. महात्मा फुलेंच्या काळात अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्याचा किंवा पाण्याला शिवण्याचा हक्क नव्हता. त्यावेळी महात्मा फुलेंनी पुण्यामध्ये आपल्या स्वत:च्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला होता.

ब्राम्हण पुरोहित देव व माणूस यांचा मध्यस्थ म्हणून धर्माच्या नावाखाली सर्वसामान्य माणसांची मोठया प्रमाणात आर्थिक पिळवणूक करत होते. ब्राम्हण पुरोहित खूप पैसे घेऊन विवाह लावून देत होते. म्हणून महात्मा फुलेंनी ब्राम्हणाशिवाय विवाह लावण्याची नविन सत्यशोधक पध्दत सांगितली होती. त्यांच्या मते या विवाहाच्या वेळी धर्मविधी व कर्मकांडावर होणारा खर्च अंध व अपंगाना मदत म्हणून दयावा. तसेच शाळेलाही दान म्हणून दयावा.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

महात्मा फुलेंनी पुणे महानगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षाला 18 जुलै 1880 रोजी पत्र लिहिले आणि पुणे शहरात लोकवस्तीमध्ये मद्यपानगृह चालू केल्यास त्याचे होणारे दुष्परिणाम सांगितले. शेतक-यांचा असूड, ब्राम्हणांचे कसब इत्यादी अनेक ग्रंथामधून महात्मा फुलेंनी सर्वसामान्यांची व शेतक-यांची ब्राम्हण भिक्षूक कशी पिळवणूक करतात हे त्यांनी आपल्या साहित्यातून मांडले आहे. महात्मा फुलेंनी सावकारशाहीलाही विरोध केला.

समाजामध्ये चालू असलेल्या बालविवाह, बालजरठ विवाह, बहुपत्नीत्व, तरुण विधवांच्या पुनर्विवाहाला समाजाचा असणारा विरोध यांसारख्या अनेक वाईट रुढी परंपरांमुळे स्त्रियांचे जीवन अतिशय हलाखीचे झाले होते. म्हणून या वाईट रुढी परंपरा बंद झाल्या पाहिजे व समाजात स्त्री-पुरुष समानता निर्माण झाली पाहिजे असे महात्मा फुलेंचे मत होते. महात्मा फुलेंनी स्त्री-पुरुष समानतेसाठी संपूर्ण आयुष्यभर या वाईट रुढी परंपरा नष्ट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. तसेच अंधश्रध्दा, देवदासी प्रथा, वाघ्या व मुरळी प्रथा यांसारख्या वाईट प्रथांनाही महात्मा फुलेंनी विरोध केला.

महात्मा फुलेंनी 24 सप्टेंबर 1873 रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाज चळवळीने महात्मा फुलेंच्या काळात व नंतरही फार मोठे सामाजिक कार्य केले. शिक्षणाचा प्रसार केला. शूद्र, अतिशूद्रांच्या मुलांना शिष्यवृत्त्या दिल्या. ब्राम्हणाशिवाय सत्यशोधक पध्दतीने विवाह लावून दिले. शेतकरी व शेतमजूरांना शिक्षणाचे महत्व सांगितले. सत्यशोधक समाज चळवळीने सामाजिक विषमता व गुलामगिरी विरुध्द संघर्ष करुन सामाजिक समता स्थापन करण्यासाठी मोलाचे कार्य केले.

इ.स.1882 मध्ये भारतातील शिक्षणविषयक प्रश्नांचा अभ्यास करुन त्याबाबत शिफारशी करण्यासाठी ब्रिटिश सरकारने सर विल्यम हंटर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण आयोग नेमला होता. या आयोगाला महात्मा फुलेंनी लेखी निवेदन दिले होते. या निवेदनामध्ये महात्मा फुलेंनी मांडलेले विचार-

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

1) इंग्रज सरकारने भारतामध्ये प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे.

2) दारिद्रय व दारिद्रीमुळे शिक्षण न घेऊ शकलेल्या मुलांना सरकारने शिष्यवृत्ती दयावी.

3) स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देऊन स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी उपाययोजना कराव्यात.

4) जातीयतेमुळे दलित अस्पृश्य जातीतील मुलांना शाळेत प्रवेश दिला जात नाही. त्यासाठी अशा विदयार्थ्यांसाठी ब्रिटिश सरकारने स्वतंत्र शाळा सुरु कराव्यात.

महात्मा फुलेंनी सामाजिक समतेचा पाया घातला होता. अशा या महान पुरुषाचा 28 नोव्हेंबर 1890 रोजी मृत्यू झाला.

लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या मते- "महात्मा फुले हे सामाजिक गुलामगिरी विरुध्द बंड करणारे पहिले महापुरुष होते."

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपला 'हू वेअर द शूद्राज ?' हा ग्रंथ महात्मा फुलेंना समर्पित केला आणि आपली त्यांच्या विषयीची कृतज्ञता व्यक्त केली.

**सारांश :-**

महात्मा फुलेंनी आपले संपूर्ण आयुष्य शूद्र, अतिशूद्र, स्त्रिया, शेतकरी व कष्टक-यांच्या उध्दारासाठी खर्च केले. समाज परिवर्तनाचे कार्य करताना महात्मा फुलेंनी स्वत:च्या घरादाराचाही विचार केला नाही. भारतीय समाजामध्ये चालत आलेल्या अनेक वाईट रुढी परंपरा नष्ट करण्यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. स्त्री शिक्षण, अस्पृश्यता, विधवांचे विवाह आणि शेतक-यांचे हित यासाठी महात्मा फुले यांनी केलेले कार्य हे मोलाचे आहे.

## संदर्भ ग्रंथ

*महात्मा फुले आणि महाराष्ट्रातील राजकारण - डॉ. शाम कदम, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद. 5 फेब्रुवारी 2008*

*समग्र वाङ्मय : महात्मा फुले - डॉ. प्रतिभा अहिरे, साद प्रकाशन औरंगाबाद. 28 नोव्हेंबर 2013*

*आधुनिक भूमीपुत्र ज्योतीराव फुले आणि शेतक-यांचा असूड- प्रा.डॉ. आशा सारीपुत्र तुपेरे, एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर. 28 नोव्हेंबर 2013*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

*सत्यशोधक चळवळ : वाटचाल आणि चिकित्सा- डॉ.संभाजी खराट ,प्रतिमा प्रकाशन पुणे. जुलै 2005*
*महात्मा ज्योतीराव फुले : सामाजिक आणि शैक्षणिक कार्य - डॉ. अ.रा.कुलकर्णी, डायमंड पब्लिकेशन 6 जुन 2008*
*महात्मा ज्योतीराव फुले चरित्र - धनंजय कीर, वेद प्रकाशन पुणे.*
*https://maharashtratimes.com*
*https://www.esakal.com*
*https://mr.vikaspedia.in*
*https://mr.m.wikipedia.org*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*